राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

**कालमर्यादा – दि.२१/०७/२०२२**

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०२२/ ३०२९ दिनांक 08 JUL 2022

प्रति,

संचालक/ प्राचार्य
सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित/ स्वायत्त व अस्वायत्त पदवी व पदविका संस्था,पुणे

विषय – तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय ,अशासकीय अनुदानित स्वायत्त व अस्वायत्त पदवी व पदविका संस्थामधील अध्यापकांना दि.१७/१०/२०१५ ते ०७/११/२०१५ या कालावधीत ५ व्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार व दि.०८/११/२०१५ ते १०/०९/२०१९ या कालावधीत ६ व्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार करीअर ॲडव्हान्समेंट योजनेतंर्गत (CAS) पदोन्नतीच्या लाभाचे प्रस्ताव सादर करणेबाबत ...

संदर्भ – मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४-४अ/आस्था/कॅस/६ वावेअ/२०२२ /४२७ दिनांक ०७/०७/२०२२

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाचे अवलोकन करावे. परिपत्रक संचालनालयाचे संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर परिपत्रकातील सर्व सुचना विचारांत घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी. परिपत्रकातील नमूद कालावधीतील पात्र अध्यापकांचे अचूक प्रस्ताव संस्थास्तरावर तपासणी करुन दिनांक २१/०७/२०२२ पुर्वी **व्दिप्रतीत** या कार्यालयांस सादर करावेत. प्रस्तावासोबत जोडलेल्या सहपत्रांच्या छायाप्रती ठळक व साक्षांकित केलेल्या असणे अनिवार्य आहेत.

परिपत्रकातील Part B –Check List (Page No.3 to 8) प्रत्येक अध्यापकाची सॉफ्ट कॉपी आपणांकडे उपलब्ध करुन घ्यावी. व ती या कार्यालयांस est.ropune@gmail.com या ईमेलवर मेल करावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७३/४२४/४३४,
ई-मेल–desk4a@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : ४-४अ/आस्था/कॅस/६ वावेआ/२०२२/४२७ दिनांक : 07 JUL 2022

परिपत्रक

विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित स्वायत्त व अस्वायत्त पदवी व पदविका संस्थांमधील अध्यापकांना दि.१७/१०/२०१५ ते ०७/११/२०१५ या कालावधीत ५ व्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार व दि.०८/११/२०१५ ते १०/०९/२०१९ या कालावधीत ६ व्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार करीअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत (CAS) पदोन्नतीच्या लाभाचे प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.कॅस २०१३/(३२/१३)/तांशि-२,दि.१७/१०/२०१५.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.सावेआ-१११९/प्र.क्र.४४/१९/तांशि-२ ,दि.११/०९/२०१९ (पदवी व पदविका)
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एमआयएससी /१११९/२८/१६/टीई-२ दि. ०३/०६/२०२२.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित, स्वायत्त व अस्वायत्त पदवी व पदविका संस्थांमधील अध्यापकांना संदर्भिय क्र.१ च्या शासन निर्णयातील निर्देशानुसार ५ व्या वेतन आयोगानुसार करीअर डव्हान्समेंट योजनेअंतर्गत (कॅस) लाभ देण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात आलेली आहे.

शासनाने ६ व्या व ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या अधिसूचना विचारात घेऊन संदर्भिय क्र.३ चा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयामधील तरतुदीनुसार करीअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत आर्थिक लाभ व पदोन्नतीसाठी पात्र ठरविण्यासाठीच्या निकषात बदल झालेले असल्याने, सदर संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयात नमूद सर्व बदल विचारात घेऊन त्यानुसार खालील नमुद कालावधीतील पदवी व पदविका संस्थांमधील सदर योजनेंतर्गत पात्र ठरणा-या अध्यापकांचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

| कालावधी | पदवी संस्था | पदविका संस्था |
|---|---|---|
| ५ वा वेतन आयोगातील तरतुदीनुसार (दि.१७/१०/२०१५ ते ०७/११/२०१५) | कॅस अंतर्गत वरीष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रस्ताव तसेच सहाय्यक प्राध्यापक (असुधारीत पदनाम) व प्राध्यापक पदावर पदोन्नती प्रस्ताव | कॅस अंतर्गत अधिव्याख्याता/ कर्मशाळा अधिक्षक यांना वरीष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रस्ताव |
| ६ वा वेतन आयोगातील तरतुदीनुसार (दि.०८/११/२०१५ ते १०/०९/२०१९) | कॅस अंतर्गत सहाय्यक प्राध्यापक (सुधारित पदनाम) /कर्मशाळा अधिक्षक (स्टेज १-२ व २-३) तसेच सहाय्यक प्राध्यापक / कर्मशाळा अधिक्षक यांना सहयोगी प्राध्यापक पदावर पदोन्नती (स्टेज ३-४) आणि सहयोगी प्राध्यापक यांना प्राध्यापक पदावर पदोन्नती (स्टेज ४-५) | ६ व्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार अधिव्याख्यात्यांना/ कर्मशाळा अधिक्षक (स्टेज १-२, स्टेज २-३ आणि स्टेज ३-४) आणि विभाग प्रमुख /अधिव्याख्याता/ कर्मशाळा अधिक्षक (स्टेज ४-५) |



तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
08 JUL 2022
आवक क्र. 8302

सदर प्रस्तावाकरीता आवश्यक असलेला अर्जाचा विहित नमुना तसेच पदवी व पदविका संस्थांमधील अध्यापकांना भरुन दयावयाचे स्वतंत्र API/PBAS चे प्रपत्र व ५ व्या व ६ व्या वेतन आयोगानुसार पदवी व पदविका संस्थांमधील अध्यापकांना लाभाकरीता / पदोन्नतीकरीता अनुज्ञेय असलेले निकष व एकत्रित विवरणपत्र संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. उपरोक्त सर्व दस्तावेज संबंधितांनी संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन घेऊन संबंधित अध्यापकांनी आवश्यक त्या दस्तावेजासह विहीत सर्व प्रपत्रामधील माहिती भरुन प्रमाणित करुन (Hardcopy) दिनांक २१/०७/२०२२ पूर्वी प्राचार्यामार्फत संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करावेत. संबंधित विभागीय कार्यालयांनी प्राप्त झालेले प्रस्ताव एकत्रित करुन पदवी संस्थांतील अध्यापकांचे प्रस्ताव कार्यासन क्र. ४ व पदविका संस्थांतील अध्यापकांचे प्रस्ताव कार्यासन क्र. ४ अ यांच्याकडे सादर करावेत.

पदवी व पदविका संस्थांमधील अध्यापकांचे API/PBAS चे प्रपत्र सन २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीतील वर्षनिहाय भरुन सादर करावेत. तसेच अध्यापकांचे यापूर्वी विषयांकित प्रस्ताव सादर केलेले असले तरी, उपरोक्त निर्देशानुसार नव्याने सुधारित प्रस्ताव सादर करावेत. ज्या अध्यापकांचे सुधारित प्रस्ताव प्राप्त होणार नाहीत त्यांच्या प्रकरणी कॅस अंतर्गत लाभ अनुज्ञेय करण्याबाबत विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सर्व विभागीय कार्यालयांनी संस्थांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दिनांक २५/०७/२०२२ पर्यंत संचालनालयाकडे सादर करावेत.

तसेच पदवी संस्थांमधील अध्यापकांचे प्रस्ताव संचालनालयातील कार्यासन क्र. ४ च्या desk४@dtemaharashtra.gov.in व पदविका संस्थांमधील अध्यापकांचे प्रस्ताव संचालनालयातील कार्यासन क्र. ४अ च्या desk४a@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर सुध्दा पाठविण्यात यावेत.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर यांना माहितीकरीता. तसेच असेही कळविण्यात येते की, सदरचे प्रस्ताव पडताळणी करुन विहीत मुदतीत संचालनालयास सादर करावेत.
३) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.
४) सर्व संचालक /प्राचार्य(स्वायत्त व अस्वायत्त) शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्था यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.